‘ड्रीम रन’मध्ये धावली मेट्रो ३ची टीम

मुंबई मॅरेथॉन स्पर्धा २०१७

मुंबई, १५ जानेवारी २०१७ - मुंबई मेट्रो रेल कॉरपोरेशन मधील २६ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या टीमने आज मुंबई मेरेथॉनच्या ड्रीम रनमध्ये सहभाग नोंदवून सीएसटी ते मेट्रो बिग सिनेमा दरम्यानचे ६ किमी अंतर यशस्वीपणे पार केले. या टीमचे नेतृत्व कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती अश्विनी भिडे यांनी केले. स्पर्धेत भाग घेण्यासाठी ‘कनेक्टींग द अनकनेक्टेट’ चे स्लोगन असलेली खास ‘टी शर्ट’ देखील तयार करण्यात आली होती.

उत्साही वातावरणात पार पडलेल्या स्पर्धेविषयी आपली प्रतिक्रिया देताना श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या की, ‘ड्रीम रन संपूर्ण टीमने यशस्वीरित्या पूर्ण केल्याचा आनंद होत आहे. मॅरेथॉन दरम्यान जागोजागी असलेले बॅनर्स आणि माहिती पत्रकांद्वारे जास्तीत जास्त लोकांना आम्ही संपूर्ण भुयारी असलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गाची माहिती देण्याचा प्रयत्न केला.